स्थापना : 1968

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सलग्नीत

# शिवाजी महाविद्यालय, उदगीर

(Re-Accredited by NAAC at 'B' Grade with 2.78 CGPA)

## कनिष्ठ विभाग

(कला, वाणिज्य व विज्ञान)

## माहिती पुस्तिका (Prospectus)

## 2023-24





राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL


*An Autonomous Institution of the University Grants Commission*

## *Certificate of Accreditation*

*The Executive Committee of the*
*National Assessment and Accreditation Council*
*on the recommendation of the duly appointed*
*Peer Team is pleased to declare the*
*Kisan Shikshan Prasarak Mandal's*
*Shivaji Mahavidyalaya*
*Udgir, Dist. Latur,*
*affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Maharashtra as*
*Accredited*
*with CGPA of 2.78 on four point scale*
*at B grade*
*valid up to November 14, 2020*

*Date : November 15, 2015*

*Director*



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

**Certificate of Academic and Administrative Audit**

I am directed to inform that:

The Academic Council of the University, on the recommendation of the duly constituted Committee for Academic and Administrative Audit as per the Maharashtra Public Universities Act, 2016, is pleased to declare that **Shivaji Mahavidyalaya, Udgir, Tq. Udgir, Dist. Latur** has been audited during the academic year 2020-21. The score obtained by the said college/institute is as given below:


| Sr. No. | Criteria | Maximum Score | Obtained Score | Percentage of score |
|---|---|---|---|---|
| 01. | Governance and Policy Making | 40 | 40 | 100.00 |
| 02. | Infrastructure and Student Amenities | 240 | 237 | 98.75 |
| 03. | Management of Finance | 40 | 35 | 87.50 |
| 04. | Administrative Criteria | 60 | 60 | 100.00 |
| 05. | Academic Criteria | 180 | 178 | 98.89 |
| 06. | Socio-Economic Criteria | 20 | 20 | 100.00 |
| | Total | 580 | 570 | 98.27 |

The college has received overall **Grade 'O'** with 98.27%

This Certificate is valid up February 07, 2025

Place: Nanded
Date : February 08, 2022

Deputy Registrar
(Affiliation Section)



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

(नॅक पुनर्मूल्यांकन 'अ' दर्जा)

उत्कृष्ट महाविद्यालय (ग्रामीण विभाग)
सन २०१७–१८

**विद्यापीठ पुरस्कार**

किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे
शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या प्रशंसनीय कार्याच्या गौरवाप्रित्यर्थ पुरस्कार देऊन आपणास सन्मानित करण्यात येत आहे.

दिनांक २० सप्टेंबर २०१७

प्रा. डॉ. पंडित विद्यासागर
कुलगुरू




माहिती पुस्तिका प्रकाशक

**डॉ.अरविंद नवले**

प्र.प्राचार्य

**शिवाजी महाविद्यालय, उदगीर – ४१३ ५१७**

जि.लातूर (महाराष्ट्र)

Email : smusrcolloge2007@rediffmail.com Website : www.shivajicollegeudgir.in



# भूमिका ...

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

"उद्धाराया जनसामान्याते । देऊ शिक्षण गुणवत्तेचे ।" ("Quality Education for the Advancement of the Masses") या तत्त्वाचा अंगिकार करून किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी महाविद्यालयाने १९६८ साली चेतविलेला ज्ञानयज्ञ गेल्या ५५ वर्षापासून अव्याहतपणे यशस्वी विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडवीत आला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करताना मबहुजन हिताय, बहुजन सुखायफ या संस्थेच्या ब्रीदवाक्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन एका आदर्श समाज निर्मितीसाठीचे योगदान देत आला आहे.

या परिवारात स्वातंत्र्याची पहाट उर्वरित भारतींयापेक्षा एक वर्ष, एक महिना आणि दोन दिवस उशिरा उगवली. अस्मानी आणि सुलतानी संकटांना तोंड देत, दुष्काळाचे वार अंगावर झेलत काळ्या मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांची ही भूमी आहे. या परिसरातील शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या मुलां मुलींना जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच या संस्थेची व महाविद्यालयाची वाटचाल सुरूवातीपासून, अविरतपणे चालू आहे. या परिसरातील वंचितांना, बहुजनांना न्याय मिळावा, शिक्षणाची संधी मिळावी, त्यांच्या लेकरांना ज्ञानगंगेच्या तीरावर आणावे यासाठी कै.बळवंतराव खानापूरकर, कै.बापुसाहेब पाटील एकंबेकर, कै.तुकाराम पाटील तादलापूरकर, कै.पी.जी.पाटील एकंबेकर, कै.दत्तुगीर तोंडचिरकर व त्यांच्या इतर सहकारी समाज धुरीनांनी पुढाकार घेऊन किसान शिक्षण प्रसारक मंडाळाच्या स्थापने बरोबरच या महाविद्यालयाची ही पायाभरणी केली.

आज हे महाविद्यालय शैक्षणिक बरोबरच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्वत:चे भरीव असे योगदान देत या परिसरातील एक महत्त्वाचे ज्ञानकेंद्र म्हणून उदयास आले आहे. कनिष्ठ, पदवी व पदव्युत्तर स्तरावर कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक शाखेमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाची पताका केवळ देशातच नाही तर परदेशातही फडकावली आहे. केवळ डॉक्टर्स, इंजिनियर्स, वकील, शिक्षक, प्राध्यापक, राजपत्रित अधिकारी, राजकीय क्षेत्रातील क्रियाशील नेते आदी बरोबरच सशक्त समाजाच्या जडणघडणीसाठी जो आदर्श माणूस घडावा लागतो, अशा हजारो माणसाला घडविण्याचे काम या महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेले आहे. १२ वी बोर्डात महाराष्ट्रात पहिला आलेला राहूल कासराळीकर, महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ.दयानंद डोणगावकर, न्यायमूर्ती राजेंद्र मुळे, बिदरचे माजी खासदार कै.नरसिंग हुल्ला (सूर्यवंशी), उदगीरचे माजी आमदार श्री गोविंद केंद्रे, कै.चंद्रशेखर भोसले, माजी नगराध्यक्ष श्री राजेश्वर निटुरे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपअधक्षिक श्री बलराज लंजिले, लंडनस्थित भौतिकशास्त्रज्ञ श्री शिवाजी पांडे, पोलिस

अधिक्षक भाग्यश्री नवटके (IPS) प्राचार्य विनायक जाधव, प्राचार्य वामन जाधव हे सगळे याच महाविद्यालयातून घडले.

कनिष्ठ, पदवी, पदव्युत्तर व संशोधन स्तरासोबतच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्रामार्फत दूरस्थ शिक्षणाचीही पदवी व पदव्युतर पर्यंतची सोय महाविद्यालयात उपलब्ध आहे. स्वा.रा.ती.म.विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राद्वारे काही विषयातील पदव्युतर शिक्षणाची सोय या शैक्षणिक वर्षापासून करीत आहोत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांच्यात सामाजिक उत्तरदायित्त्वाच्या कक्षा रूंदाव्यात, त्यांना व्यासपीठ मिळावे यासाठी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC), सांस्कृतिक व क्रिडा विभाग व माजी विद्यार्थी संघटना द्वारे महाविद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. कै.ॲड.पी.जी.पाटील एकंबेकर व कै.ॲड.सी.पी.पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वात महाविद्यालयाने नॅक, बेंगलोर कडून प्रथमत: २००४ मध्ये केलेल्या परीक्षणाला १०० पैकी ८३ गुण घेऊन 'B++' ग्रेड मिळविला. २०१५ मध्ये कै.अशोकराव पाटील एकंबेकर व कै.ॲड.सी.पी.पाटील, कै.प्रा.विजयकुमार पाटील त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली नॅक कडून दुसऱ्यावेळी मूल्यांकन करून नवीन श्रेणी पद्धतीत ४.०० पैकी २.७८ गुण घेऊन 'B' (नवीन ग्रेडींग प्रमाणे B++ समकक्ष) श्रेयांक मिळविले. या शै.वर्षी महाविद्यालय श्री.श्रीरंगराव पाटील एकंबेकर, श्री.ज्ञानदेव झोडगे गुरुजी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली नॅक कडून तिसऱ्या वेळी मूल्यांकन करून घेण्याच्या तयारीत आहे. महाविद्यालयाने विद्यापीठाकडून करुन घेतलेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात 'O+' श्रेयांक मिळाले तर २०१७-१८ चा स्वा.रा.ती.म.विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कारही मिळवला.

गेल्या शै.वर्षात कनिष्ठ स्तरावर १५०० तर पदवी, पदव्युत्तर संशोधन व व्यावसायिक स्तरावर १९५० असे एकूण ३४५० विद्यार्थी शिक्षण घेत होते. या २०२३-२४ शै.वर्षात आपण प्रवेश घेऊन आमच्या परिवाराचा एक भाग बनत आहात, म्हणून मी आपले स्वागत करतो. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याच्या आणि २१ व्या शतकाच्या गरजांना अनुरुप शिक्षण देत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमतांना पुढे आणण्याच्या, फुलवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या नवीन राष्ट्रीय शैद्वधोरण (NEP-2020) ची अमलबजावनी शासकिय आदेशानुसार आपल्याला २०२३-२४ या चालू शै.वर्षापासून करायची आहे.

तुमच्या स्वप्नांना, आशा-आकांक्षाना पूर्णत्वाकडे नेण्यासाठी माझ्या सहकारी प्राध्यापक बंधू-भगिनींच्या कुशल अध्यापनाकडे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे, आमच्या समृद्ध ग्रंथालयामुळे कायमचे बळ मिळत राहील असा दृढ विश्वास व्यक्त करतो. सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

धन्यवाद !

**डॉ. अरविंद एम. नवले**
**प्र.प्राचार्य**

# महाविद्यालयाचे नियम

## उपस्थितीसंबंधी

१) प्रत्येक नियमित आणि ज्यादा तासाला विद्यार्थ्यांची उपस्थिती घेतली जाते.

२) विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे.

३) महाविद्यालयातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा, वक्तृत्व व वादविवाद, एन.सी.सी., एन.एस.एस., शैक्षणिक सहली अथवा अन्य कारणांसाठी विद्यार्थी महाविद्यालयात अनुपस्थित राहिल्यास प्रभारी प्राध्यापकांच्या स्वाक्षरीसह त्या-त्या वेळेचे अर्ज कार्यालयात दाखल करणे बंधनकारक आहे.

४) विद्यार्थी आजारी असल्यास आजारानंतर महाविद्यालयात येताना वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक राहील. जास्त दिवस आजारी असल्यास पालकाद्वारे महाविद्यालयात पूर्व सूचना देणे आवश्यक आहे.

५) प्रत्येक महिन्यातील उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास

अ) पालकांना कळविले जाते.

ब) दंड आकारला जातो.

क) रेकॉर्ड बुक प्रमाणित केले जात नाही.

ड) महाविद्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलती रद्द केल्या जातात.

इ) बोर्डाकडून परीक्षेला बसण्याची परवानगी नाकारली जाते.

ई) प्रवेश रद्द केला जातो.

## परीक्षेसंबंधी

१) महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या मासिक / सत्र / सराव / पूर्व वार्षिक परीक्षेत अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

२) परीक्षेत सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात आणि त्यांची नावे श्रेयफलकावर लिहिली जातात.

३) विद्यार्थ्यांनी कोणत्याही परीक्षेत कसल्याही प्रकारच्या अवैध मार्गाचा अवलंब करू नये.

## खालील कृत्यांचा शिस्तभंगात समावेश होतो.

१) ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येणे.

२) गटबाजी करणे

३) गोंधळ घालणे

४) भांडणे करणे

५) सामुहिक सुट्टी घेणे

६) विद्यार्थिनींची छेडछाड करणे.

७) कर्मचारी व प्राध्यापकांशी उद्धट वर्तन करणे.

८) प्राध्यापकांची आज्ञा भंग करणे.

९) तंबाखू, पान खाणे, भिंतीवर थुंकणे, धुम्रपान करणे.

१०) गणवेशात न येणे.

११) महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर, स्वच्छतागृहात असभ्य मजकूर लिहिणे व चित्रे काढणे.

१२) वर्ग चालू असताना व्हराड्यांत रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे इ.

१३) बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेटून किंवा पत्राने सूचना दिली जाते. विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो. शैक्षणिक सवलती बंद केल्या जातात. परीक्षा फॉर्म भरला जात नाही. प्रवेश रद्द केला जातो. विशिष्ट प्रसंगी विद्यार्थ्यांवर पोलीस कारवाई केली जाते.

१४) महाविद्यालयाच्या परवानगीशिवाय परस्पर सहलीचे आयोजन करणे व महाविद्यालयाच्या बाहेर स्नेहसंमेलनासारखे कार्यक्रम आयोजित करणे इ. बेशिस्त वर्तन समजले जाईल.

**गणवेश :** महाविद्यालयात सर्व विद्यार्थ्यांनी ठरवून दिलेल्या दिवशी गणवेशात येणे बंधनकारक आहे.

खालील विभागतून प्रत्येक एक विद्यार्थी प्रतिनिधी

अ) क्रीडा विभाग ब) सांस्कृतिक विभाग

क) प्रत्येक वर्गातून मागील परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीची वर्ग प्रतिनिधी म्हणून निवड केली जाईल. विद्यार्थी संसदेच्या नियुक्त सदस्यातून संसद सचिवाची निवड केली जाईल.

**मुलींचे वसतिगृह :** महाविद्यालयाच्या बाजूस जिजामाता या नावाने वसतिगृह सुरू आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रवेश मिळेल व तेथील नियम बंधनकारक राहतील.

## ग्रंथालय विभाग

१) विद्यार्थ्याने ओळखपत्र घेताना मूळ प्रमाणपत्र दाखल केलेली पावती व ग्रंथालय शुल्क भरलेली पावती दाखवून तात्काळ ओळखपत्र घेऊन जावे.

२) डुप्लीकेट ओळखपत्रासाठी रू.१५०/- व डुप्लीकेट गृहवाचन पत्रिकेसाठी रू.३०/- शुल्क भरावे लागेल.

३) ग्रंथालयातून ग्रंथ घेत असताना त्याची पाने तपासून घ्यावीत.

४) ग्रंथ हरवल्यास किंवा खराब झाल्यास नवीन ग्रंथ उपलब्ध करून द्यावा लागेल अन्यथा ग्रंथाच्या अद्ययावत किंमतीच्या दीडपट रक्कम वसूल केली जाईल.

५) अभ्यासिकेतून ओळखपत्रावर घेतलेली पुस्तके किंवा इतर वाचन साहित्य घरी जातांना परत करावीत अन्यथा दररोज रू.१०/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

६) दिवाळीच्या सुट्टीत ग्रंथालय चालू राहील. दिवाळी अथवा उन्हाळी सुट्टीसाठी पुस्तके मिळणार नाहीत. सुट्टीमधील विलंब शुल्क माफ केले जाणार नाही.

**देवघेव विभाग :** १) विद्यार्थ्यांनी मागणीपत्र (डिमांड स्लिप) भरून ग्रंथ मागणी करावी.

२) सभासदपत्रावर पाठ्यपुस्तके व इतर ग्रंथ फक्त सात दिवसांकरिता दिले जातील.

३) संदर्भग्रंथ व दुर्मिळ ग्रंथ बाहेर दिले जाणार नाहीत, मात्र ते वाचनकक्षात ओळखपत्रावर घेवून वाचता येतील.

४) देवघेव विभाग सकाळी ९.३० ते दुपारी ५.०० या वेळेत चालू राहील.

५) दुर्मिळ ग्रंथ व संदर्भ ग्रंथाचे झेरॉक्स करून घेण्यासाठी रू.१/- विलंब शुल्क आकारले जाईल. जादा मागणी असलेले ग्रंथ मुदतीत परत न केल्यास प्रतिदिन रू. ५/- दंड आकारला जाईल.

**अभ्यासिका :** १) अभ्यासिका सकाळी ८.३० ते दुपारी ५.३० पर्यंत खुली राहील.

२) ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही.

३) पाठ्यपुस्तके, स्पर्धा परीक्षेची पुस्तके, दैनिके, नियतकालिके व प्रश्नपत्रिका संच इ. वाचनसाहित्य ओळखपत्रावर मिळेल.

४) विद्यार्थ्यांनी शांतता पाळावी इतरांना त्रास होईल असे वर्तन करू नये.

५) रात्रीची अभ्यासिका सायंकाळी ६.०० ते १०.०० पर्यंत १ जानेवारी ते वार्षिक परीक्षा संपेपर्यंत चालू राहील. सुट्टीच्या दिवशी अभ्यासिका बंद राहील.

६) ग्रंथ किंवा ग्रंथेत्तर साहित्य दुपारी ३.०० ते ५.३० दरम्यान मिळतील मात्र घेतलेले साहित्य अभ्यासिका बंद होण्यापूर्वी परत करावे. उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांस दंड केला जाईल अथवा प्रवेश रद्द केला जाईल.

**सायकल / बाईक पार्किंग :** १) सायकल/बाईकला कुलूप लावल्याशिवाय ठेवू नये.

२) सायकल/बाईक संबंधी नियम आखण्याचा व तो कार्यान्वित करण्याचा हक्क प्राचार्यांचा असेल.

३) सायकल/बाईक पार्किंग महाविद्यालयाच्या मबीफ बिल्डींगच्या अंडरग्राऊंडमध्ये उपलब्ध करून दिलेली आहे.

## विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधा :

१) मुलींसाठी १२० क्षमतेचे सुसज्ज असे जिजामाता वसतिगृह.

२) सर्व विद्यार्थ्यांसाठी २४ X ७ R.O. चे पाणी.

३) दिव्यांगांसाठी लिफ्ट व रॅंप.

४) सायकल व बाईकसाठी पार्किंगची सोय.

५) मुलींसाठी सर्व सोयींनी युक्त असे स्वतंत्र कक्ष.

६) पावरकट काळात यु.पी.एस. जनरेटरची व्यवस्था.

७) विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी जीम.

८) सर्वांसाठी कॅन्टीन.

९) विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका.

१०) समृद्ध ग्रंथालय.

### २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी खालील वर्गात प्रवेश देण्यात येत आहे.

### कनिष्ठ महाविद्यालय (Junior College)

* इयत्ता ११ वी : कला, विज्ञान, वाणिज्य.
* इयत्ता १२ वी : कला, विज्ञान, वाणिज्य, (शै.वर्ष २०२१-२२ पासून पुनर्रचित अभ्यासक्रम)
* विद्यार्थ्यांसाठी या महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी ठराविक नमुन्यातील प्रवेश अर्ज भरून कार्यालयात वेळेत सादर करावा.
* महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी स्थलांतराचा दाखला (Migration Certificate) स्वत: आणणे आवश्यक आहे.

* प्रवेश अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या प्रत्येकी दोन सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) परीक्षेचे गुणपत्रक (Marks Memo) मूळ. २) स्थलांतर प्रमाणपत्र (T.C.) मूळ.

३) आधार कार्ड. ४) उत्पन्नाचा दाखला (Income Certificate)

५) मागासवर्गीय जातप्रमाणपत्र (Caste Certificate) उपजिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकाऱ्यांकडून प्रमाणित केलेले असावे.

६) शिक्षणात खंड पडला असल्यास त्या संबंधीचे खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) मूळ प्रत.

७) महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाबाहेरील विद्यार्थ्यांनी पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) फॉर्म भरून देणे आवश्यक आहे.

८) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेचा निकाल लागल्यानंतर आपला प्रवेश अर्ज आवश्यक प्रमाणपत्रासह त्वरित कार्यालयात दाखल करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. नंतर आलेल्या प्रवेश अर्जासंबंधी जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही.

९) प्रवेश अर्जासोबत सर्व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. त्यात कमतरता असल्यास किंवा विसंगती आढळून आल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

१०) प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष पूर्ण होईप्रर्यंत कोणत्याही सबबीवर टी.सी. किंवा अन्य प्रमाणपत्राची मागणी करता येणार नाही. त्यासाठी पूर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील.

११) विहित मुदतीत नाव नोंदविलेले अर्जदार विद्यार्थी प्रवेशास पात्र राहतील.

१२) शासन नियमानुसार राखीव व खुल्या प्रवर्गातील प्रवेश होतील.

**टीप : वरील निर्दिष्ट जागा फक्त नाव नोंदविलेल्या अर्जदारामधूनच भरल्या जातील.**

## कनिष्ठ महाविद्यालय अभ्यासक्रमाचे विषय

### ११ वी कला : प्रवेश क्षमता २४०

| | | |
|---|---|---|
| **अनिवार्य विषय** | : | १) इंग्रजी (१०० गुण) २) पर्यावरण शिक्षण जलसुरक्षा (ग्रेड) |
| | | ३) शारीरिक शिक्षण व आरोग्य (ग्रेड) |
| **द्वितीय भाषा** | : | १) मराठी / हिंदी / संस्कृत / उर्दू / (यापैकी एक)(१०० गुण) |
| **ऐच्छिक विषय** | : | १) राज्यशास्त्र (१०० गुण) २) समाजशास्त्र (१०० गुण) |
| | | ३) इतिहास (१०० गुण) ४) अर्थशास्त्र (१०० गुण) |
| **एकूण** | : | ६०० गुण |

**१२ वी कला :** इयत्ता ११ वीत निवडलेलेच विषय १२ वी कला शाखेत अभ्यासावे लागतील.

### ११ वी वाणिज्य (संयुक्त) : प्रवेश क्षमता १२०

| | | |
|---|---|---|
| **अनिवार्य विषय** | : | १) इंग्रजी (१०० गुण) २) पर्यावरण शिक्षण जलसुरक्षा (ग्रेड) |
| | | ३) शारीरिक शिक्षण व आरोग्य (ग्रेड) |
| **द्वितीय भाषा** | : | १) मराठी / हिंदी / संस्कृत / उर्दू / (यापैकी एक)(१०० गुण) |

ऐच्छिक विषय :

| | |
|---|---|
| १) सचिवाची कार्यपद्धती (S.P.) (१०० गुण) | २) व्यापार संघटन (O.C.M.) (१०० गुण) |
| ३) अर्थशास्त्र (१०० गुण) | ४) पुस्तपालन व लेखाकर्म (B.K.) (१०० गुण) |

एकूण : ६०० गुण

### १२ वी वाणिज्य :

**इयत्ता ११ वीत निवडलेलेच विषय १२ वी वाणिज्य शाखेत अभ्यासावे लागतील.**

### ११ वी विज्ञान : प्रवेश क्षमता - ४८०

**अनिवार्य विषय :** १) इंग्रजी (१०० गुण) २) पर्यावरण शिक्षण जलसुरक्षा (ग्रेड) ३) शारीरिक शिक्षण व आरोग्य (ग्रेड)

**द्वितीय भाषा :** १) मराठी / हिंदी / संस्कृत / उर्दू / (यापैकी एक)(१०० गुण)

**ऐच्छिक विषय :** खालीलपैकी एक गट निवडावा

| तांत्रिक गट - १ (PCM) | वैद्यकीय गट - १ (Medical PCB) | जनरल गट - १ (General PCBM) |
|---|---|---|
| भौतिकशास्त्र (१०० गुण) | भौतिकशास्त्र (१०० गुण) | भौतिकशास्त्र (१०० गुण) |
| रसायनशास्त्र (१०० गुण) | रसायनशास्त्र (१०० गुण) | रसायनशास्त्र (१०० गुण) |
| गणित व संख्याशास्त्र (१०० गुण) | जीवशास्त्र (१०० गुण) | जीवशास्त्र (१०० गुण) |
| इलेक्ट्रॉनिक्स/ (२०० गुण) संगणक | दुग्धव्यवसाय (२०० गुण) | गणित व संख्याशास्त्र / समाजशास्त्र / पशुविज्ञान शास्त्र (१०० गुण) |

**नोट :** १) इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र व दुग्ध व्यवसाय या द्विलक्षी अभ्यासक्रम निवडलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा राहणार नाही. २) प्रवेश अर्जावर विद्यार्थ्यांनी लिहिलेले विषय अंतिम नव्हेत तर गुणवत्तेनुसारच विषय निश्चित केले जातात. विषय निश्चिती हे शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम समजावी.

**१२ वी विज्ञान : इयत्ता ११ वीत निवडलेलेच विषय १२ वी विज्ञान शाखेत अभ्यासावे लागतील.**

**टीप :** नवीन शै.धोरणानुसार जर कांही बदल झाले तर ते विद्यार्थ्यांना वेळोवेळी कळवले जातील.

## गुणवत्ताधारक पात्र विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्या

| अ. क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | किमान गुण | उत्पन्नाची मर्यादा | लागणारी कागदपत्रे व इतर माहिती |
|---|---|---|---|---|
| 1. | Rajarshi Shahu Maharaj Scholarship for NT & SC for the XI & XII | ७५% | नाही | १) टी.सी., २) मार्क मेमो ३) जात प्रमाणपत्र ४) बोनाफाईड ५)आय.डी.सत्यप्रत |

| अ. क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | किमान गुण | उत्पन्नाची मर्यादा | लागणारी कागदपत्रे व इतर माहिती |
|---|---|---|---|---|
| २. | Minority Scholarship for all Classes XI to PG | ६०% | ४०,००० | १) टी.सी., २) मार्क मेमो<br>३) उत्पन्नाचे प्रमाणपत्र<br>४) बोनाफाईड ५) आय.डी.सत्यप्रत |
| ३. | प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती | ७५% | २५,००० | १) टी.सी., मार्क मेमोची सत्यप्रत<br>२) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (मु.अ. कडून शिक्षकांच्या ॲफिडेव्हीट वरीलप्रमाणे) |
| ४. | राज्य सरकार खुली गुणपत्ता | ७५% | उत्पन्नाची अट नाही | १) टी.सी., मार्क मेमोची सत्यप्रत<br>२) नुतनीकरणासाठी मार्क मेमो<br>३) कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावर लागू |
| ५. | अपंग शिष्यवृत्ती | ८०% | २५,००० | १) अपंगत्व दर्शवणारे सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र (अपंगत्व ४०% पेक्षा जास्त)<br>२) टी.सी., मार्क मेमो सत्सप्रत<br>३) उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार)<br>४) ए.टी.के.टी.असेल तर शिष्यवृत्ती मिळत नाही. |
| ६. | ई.बी.सी. | ७५% | १५,००० किंवा ११ वी कला/वाणिज्य विज्ञान ८०% | १) टी.सी., मार्क मेमो सत्यप्रत |
| ७. | मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (G.O.I.) भारतसरकार<br>अ) ११ वी कला/वाणिज्य विज्ञान व एमसीव्हीसी<br>ब) द्वितीय व तृतीय कला, वाणिज्य व विज्ञान<br>क) द्वितीय वर्ष पदव्युत्तर | नाही | ४०,००० | १) टी.सी., मार्क मेमोची सत्यप्रत<br>२) उपजिल्हाधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र<br>३) वडील हयात नसल्यास त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र<br>४) शिष्यवृत्ती आदेश क्रमांक<br>५) शिष्यवृत्ती खंडित झाल्यास १०/- रू.बाँडवर हमीपत्र |
| ८. | कर्नाटक सरकारची मागासवर्गीय शिष्यवृत्ती | ६०% | ४०,००० | १) जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत<br>२) टी.सी., मार्क मेमोची सत्यप्रत<br>३) उत्पन्नाचे प्रमाणपत्र ४) शिक्षण खंड पडले असल्यास खंड प्रमाणपत्र |

*** वरील सर्व शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थ्यांनी Online भरावेत.**

## महत्वाची टीप :

१) १२ वी बोर्डाची परीक्षा संपल्यानंतर JEE, NEET च्या Crash Course च्या ४० परीक्षा घेण्यात येतील. या ४० परीक्षा Unit Wise, Section Wise, Subject Wise d Whole Syllabus of Subject Wise घेतल्या जातात.

२) परीक्षेचा निकाल मोबाईलवर प्रत्येक विद्यार्थ्यांला डचड ने पाठविला जातो. व लगेचच फलकावर दर्शविला जातो.

३) परीक्षेचा एक Round (सर्व विषय) झाल्यानंतर PCB, PCM. JEE, NEET गटातून प्रत्येकी १ ला व २ रा विद्यार्थी गुणानुक्रमे निवडला जातो.

४) PCB, PCM गटातून प्रत्येकी ४ विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात.

५) ही पारितोषिके बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेऊन दिली जातात.

६) हे सराव परीक्षेचे वर्ग किसान शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने चालविले जातात व त्यास वेगळे शुल्क भरावे लागतील.

७) ११ वी वर्गाच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांना MBBS व BDS या व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या आदेशानुसार राष्ट्रीय पातळीवरील NEET परीक्षा देणे बंधनकारक आहे व इंजिनिअरींग या व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय पातळीवरील JEE परीक्षा देणे बंधनकारक आहे. उर्वरित मेडीकल व पॅरामेडीकल अभ्यासक्रमासाठी राज्यशासनाच्या आदेशानुसार NEET परीक्षा देणे बंधनकारक आहे.

८) NEET & JEE (main) परीक्षेच्या तयारीसाठी एक वेगळी डशिलळरश्र तुकडीची सोय.

९) CET, NEET व JEE परीक्षेचे MCQ’s व गुण खाली तक्यामध्ये नमूद केले आहेत.

| **CET**<br>**State Engineering & B.A.M.S.** | | **JEE**<br>**NIT & IIT** | | **NEET**<br>**M.B.B.S & B.D.S.** | |
|---|---|---|---|---|---|
| Phy.- 50 MCQ’s | 50 Marks | Phy. - | 100 Marks | Phy.- 45 MCQ’s | 180 Marks |
| Chem.- 50 MCQ’s | 50 Marks | Chem.- | 100 Marks | Chem.- 45 MCQ’s | 180 Marks |
| Botany - 50 MCQ’s | 50 Marks | Math.- | 100 Marks | Botany - 45 MCQ’s | 180 Marks |
| Zology - 50 MCQ’s | 50 Marks | Each Subject 20 MCQ’s, | | Zology - 45 MCQ’s | 180 Marks |
| Math.- 50 MCQ’s | 100 Marks | 5 Numerical out of 10 | | | |
| TOTAL | 300 Marks | TOTAL | 300 Marks | TOTAL | 720 Marks |

## कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक वृंद

**प्र.प्राचार्य** – डॉ. ए. एम. नवले

**उपप्राचार्य** – श्री भोसले व्ही.आर.

**पर्यवेक्षक** – श्री सूर्यवंशी जी.जी.

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री.पवार व्ही.पी. | – वनस्पतीशास्त्र |
| ०२. | डॉ.शिंदे एन.डी. | – संस्कृत |
| ०३. | श्री.मलकमपट्टे सी.जी. | – इंग्रजी |
| ०४. | श्री.गिरी आर.पी. | – रसायनशास्त्र |
| ०५. | श्री.कांदे एन.टी. | – भौतिकशास्त्र |
| ०६. | श्री.पवार एस.टी. | – गणित |
| ०७. | श्रीमती कांबळे एस.वाय. | – वनस्पतीशास्त्र |
| ०८. | श्रीमती जाधव एस.जे. | – अर्थशास्त्र |
| ०९. | श्री.मोरे एम.के. | – वाणिज्य |
| १०. | श्री.साळुंखे एस.एस. | – इंग्रजी |
| ११. | श्रीमती पाटील एम.सी. | – वनस्पतीशास्त्र |
| १२. | श्री.बिरादार एम.बी. | – गणित |
| १३. | श्रीमती मोरे एम.यू. | – रसायनशास्त्र |
| १४. | श्री.पाटील ए.के. | – हिंदी |
| १५. | श्री.बिरादार डी.टी. | – रसायनशास्त्र |
| १६. | श्री.पाटील व्ही.एस. | – रसायनशास्त्र |
| १७. | श्री.पाटील एस.एस. | – इतिहास |
| १८. | श्री.माने जी.व्ही. | – क्रीडा शिक्षक |
| १९. | श्री.शेरे एस.बी. | – प्राणीशास्त्र |
| २०. | श्री.मोरे ए.एस. | – गणित |
| २१. | श्री.बिरादार बी.डी. | – राज्यशास्त्र |
| २२. | श्रीमती बिरादार आर.बी. | – प्राणीशास्त्र |

## द्विलक्षी विना अनुदानित अभ्यासक्रम शिक्षक वृंद

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.मोरे आर.डी. | – संगणकशास्त्र |
| २. | श्री.अनंतवाळ ए.आर. | – वाणिज्य |
| ३. | श्री.गंभीरे ए.एस. | – इलेक्ट्रॉनिक्स |

## शिक्षकेत्तर कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. पाटील बालाजी किशनराव | – प्रबंधक |
| ०२. | श्री. गुरनाळे विष्णूदास ज्ञानोबा | – अधीक्षक |
| ०३. | श्री. लाडके रविशंकर मारोती | – मुख्य लिपीक |
| ०४. | सौ. देवनाळे प्रतिभा हणमंतराव | – क.लघुलेखक |
| ०५. | सौ. शेडोळे प्रतिभा मल्लिकार्जुन | – वरिष्ठ लिपीक |
| ०६. | श्री. पाटील बाळासाहेब गणपतराव | – प्रयोगशाळा सहायक |
| ०७. | श्री. बांगे विनोद माणिकराव | – प्रयोगशाळा सहायक |
| ०८. | श्री. वळवी सुनील काशीनाथ | – प्रयोगशाळा सहायक |
| ०९. | श्री. कदम पांडुरंग माधवराव | – कनिष्ठ लिपीक |
| १०. | श्री. तोंडचिरकर सुधीर सोपानराव | – कनिष्ठ लिपीक |
| ११. | श्री. काशीमपुरे सुभाष माधवराव | – प्रयोगशाळा सहायक |
| १२. | श्री. गिरी अरूण लक्ष्मणराव | – कनिष्ठ लिपीक |
| १३. | श्री. जाधव भीम विश्वनाथ | – प्रयोगशाळा परिचर |
| १४. | श्री. मालुसरे रामदास ब्रह्माजी | – प्रयोगशाळा परिचर |
| १५. | श्री. गुंगेवाड सूर्यकांत गोविंदराव | – प्रयोगशाळा परिचर |
| १६. | श्री. जाधव दिलीप रामचंद्र | – प्रयोगशाळा परिचर |
| १७. | श्री. बिरादार अशोक मोहनराव | – प्रयोगशाळा परिचर |
| १८. | श्री. चिखले बालाजी गोविंदराव | – प्रयोगशाळा परिचर |
| १९. | श्री. झोले तुकाराम संभाजी | – प्रयोगशाळा परिचर |
| २०. | श्री. गायकयवाड मनोहर हुलाजी | – प्रयोगशाळा परिचर |
| २१. | श्री. फावडे ज्ञानेश्वर ईश्वरराव | – प्रयोगशाळा परिचर |
| २२. | श्री. बिरादार दिलीप पंढरीनाथ | – प्रयोगशाळा परिचर |
| २३. | श्री. बिरादार अनिल रामराव | – प्रयोगशाळा परिचर |
| २४. | श्री. जाधव गोविंद व्यंकटराव | – प्रयोगशाळा परिचर |
| २५. | श्री. बिरादार सुभाष जयवंतराव | – प्रयोगशाळा परिचर |

| | | |
|---|---|---|
| २६. | श्री. म्हेत्रे शिवाजी माणिकराव | - प्रयोगशाळा परिचर |
| २७. | श्री. बन सदानंद सोमनाथ | - प्रयोगशाळा परिचर |
| २८. | श्री. बिरादार रामकिशन पुंडलिकराव | - प्रयोगशाळा परिचर |
| २९. | श्री. नागरगोजे सखाराम अप्पाराव | - प्रयोगशाळा परिचर |
| ३०. | श्री. उदगीरे देवीदास शेषराव | - प्रयोगशाळा परिचर |
| ३१. | श्री. एकंबेकर राजेंद्र रामराव | - प्रयोगशाळा परिचर |
| ३२. | श्री. बापूरे सतीश रामचंद्र | - ग्रंथालय परिचर |
| ३३. | श्री. मुंडे संजय मधुकर | - प्रयोगशाळा परिचर |
| ३४. | श्री. वाघमारे गणेश रामचंद्र | - प्रयोगशाळा परिचर |
| ३५. | श्रीमती नावंदे उषा तुकाराम | - प्रयोगशाळा परिचर |
| ३६. | श्री. कांबळे विलास नारायण | - सेवक |
| ३७. | श्री. जगताप कमलाकर विश्वनाथ | - ग्रंथालय परिचर |
| ३८. | श्री. पाटील विजयकुमार तानाजी | - प्रयोगशाळा परिचर |
| ३९. | श्री. स्वामी ब्रह्मानंद गुरूलिंग | - प्रयोगशाळा परिचर |
| ४०. | श्री. बसगोंडा राजकुमार अर्जुनराव | - ग्रंथालय परिचर |
| ४१. | श्री. क्षीरसागर शिवाजी काशीनाथ | - प्रयोगशाळा परिचर |
| ४२. | श्री. राठोड मोहन रामराव | - ग्रंथालय परिचर |
| ४३. | श्री. शिंदे अनिल नारायण | - प्रयोगशाळा परिचर |
| ४४. | श्री. सूर्यवंशी बंडेप्पा गोविंद | - प्रयोगशाळा परिचर |
| ४५. | श्री. चौधरी तुकाराम दादाराव | - ग्रंथालय परिचर |
| ४६. | श्री. नाईक दिवाकर किशनराव | - ग्रंथालय परिचर |
| ४७. | श्री. दरवेशवार रमाकांत दशरथ | - प्रयोगशाळा परिचर |
| ४८. | श्री. चोपडे शिवाजी अशोक | - प्रयोगशाळा परिचर |
| ४९. | श्री. हराळे नारायण गोविंद | - ग्रंथालय परिचर |
| ५०. | श्रीमती गिरी रेखा हिरागीर | - सेवक |
| ५१. | श्री. शेंडगे नितिन विलास | - प्रयोगशाळा परिचर |

# शैक्षणिक नियोजन २०२३-२४

विद्यापीठाने व शिक्षणविभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३–२४ या वर्षाचे नियोजन राहील.

## कनिष्ठ महाविद्यालय

१) नोंदणी व प्रवेश
२) नियमित वर्ग सुरू
३) बारावी पहिली घटक चाचणी
४) अकरावी पहिली घटक चाचणी
५) बारावी दुसरी घटक चाचणी
६) अकरावी प्रथम सत्र परीक्षा
७) बारावी पूर्व वार्षिक परीक्षा झअए-ख
८) अकरावी दुसरी घटक चाचणी
९) बारावी पूर्व वार्षिक परीक्षा झअए-खख
१०) बारावी पूर्व वार्षिक परीक्षा झअए-खखख
११) अकरावी वार्षिक परीक्षा

---

# सार्वजनिक सुट्ट्या २०२३-२४

| अ.क्र. | दिनविशेष | वार व दिनांक |
|---|---|---|
| ०१) | बकरी ईद | बुधवार, २८ जून २०२३ |
| ०२) | मोहरम | शनिवार, २९ जुलै २०२३ |
| ०३) | स्वातंत्र्य दिन (ध्वजारोहण) | मंगळवार, १५ आगस्ट २०२३ |
| ०४) | पारसी नवीन वर्ष | बुधवार, १६ ऑगस्ट २०२३ |
| ०५) | विद्यापीठ वर्धापन दिन (ध्वजारोहण) | रविवार, १७ सप्टेंबर २०२३ |
| ०६) | गणेश चतुर्थी | मंगळवार, १९ सप्टेंबर २०२३ |
| ०७) | ईद ए मिलाद | गुरूवार, २८ सप्टेंबर २०२३ |
| ०८) | महात्मा गांधी जयंती | सोमवार, ०२ ऑक्टोबर २०२३ |
| ०९) | दसरा | मंगळवार, २४ ऑक्टोबर २०२३ |
| १०) | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | रविवार, १२ नोव्हेंबर २०२३ |
| ११) | दिवाळी बलिप्रतिपदा, भाऊबीज | मंगळवार, १४ नोव्हेंबर २०२३ |
| १२) | गुरूनानक जयंती | सोमवार, २७ नोव्हेंबर २०२३ |
| १३) | ख्रिसमस (नाताळ) | सोमवार, २५ डिसेंबर २०२३ |

## खालील विशेष दिनी सुट्ट्या असतील

| | |
|---|---|
| १) प्रजासत्ताक दिन (ध्वजारोहण) | २) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| ३) महाशिवरात्र | ४) महाराष्ट्र दिन (ध्वजारोहण) |
| ५) छत्रपती शिवाजी महाराज जयंती | ६) बुद्धपोर्णिमा |
| ७) गुडी पाडवा | ८) राम नवमी |
| ९) होळी (दुसरा दिवस) | १०) महावीर जयंती |
| ११) रमजान ईद | १२) गुड फ्रायडे |
| १३) मोहरम | |

## विविध दिन विशेष साजरे करणे

| | | |
|---|---|---|
| १) | आंतरराष्ट्रीय योग दिन | २१ जून |
| २) | शिक्षक दिन | ५ सप्टेंबर |
| ३) | हैद्राबाद मुक्ती दिन | १७ सप्टेंबर |
| ४) | राष्ट्रीय सेवा योजना दिन | २४ सप्टेंबर |
| ५) | एड्स जनजागृती दिन | १ डिसेंबर |
| ६) | व्यसनमुक्ती दिन (साने गुरूजी) | २२ डिसेंबर |
| ७) | मूलभूत कर्तव्य जाणीव दिन | जानेवारी महिन्यातील पहिला सोमवार |
| ८) | विज्ञान दिन | २८ फेब्रुवारी |

## प्रवेश अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यांनी घ्यावयाची दक्षता

* **सूचना :**

१) प्रवेश अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात भरून ऑनलाईन प्रवेश करावा.

२) सर्व नोंदी ठळक व स्वच्छ अक्षरात लिहाव्यात.

३) प्रवेश अर्ज भरतेवेळेस अनावश्यक बाबी खोडाव्यात.

४) छायाचित्र अलीकडील काळात काढलेला कलर फोटो चिकटवून त्याच्या बाजूस चौकटीत अर्जदार विद्यार्थ्याने स्वाक्षरी करावी.

५) ज्या वर्गात प्रवेश घ्यावयाचा आहे तो वर्ग स्पष्ट लिहावा.

६) प्रवेश घ्यावयाचे वर्ष स्पष्ट लिहावे.

७) विद्यार्थ्याने आपले नाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, आजोबाचे नाव लिहावे. यासाठी मागील वर्षाच्या मार्क मेमोवरील नाव पाहून जसेच्या तसे लिहावे.

८) टी.सी.वरील जन्म तारीख पाहून अचूक लिहावी. ९) अपडेट केलेले आधार कार्ड झेरॉक्स देणे.

१०) यु-डायस नंबर

११) विद्यार्थ्याने रक्तगट लिहावा.
१२) विद्यार्थ्याने सध्याचा पत्ता व कायमचा पत्ता वेगळा नमूद करावा. एकच असेल तर तोच लिहावा.
१३) मोबाईल, व्हॉट्सप नंबर व ई-मेल ॲड्रेस दिलेल्या रकान्यात लिहावा.
१४) जातीसंदर्भात जात व पोट जात लिहावी.
१५) ही माहिती भरतेवेळेस १० वी चा मार्क मेमो व टी.सी. समोर ठेवून विचारलेली माहिती अचूक व खाडाखोड न करता भरावी.
१६) प्रवेश घेताना जे विषय घेतले आहेत तेच कायम राहतील. कोणत्याही सबबीवर विषयात बदल करता येणार नाही. त्यामुळे प्रवेश घेते वेळी विषय निवडीचा निर्णय घ्यावा.
१७) प्रवेश अर्जात नमूद केल्याप्रमाणे टी.सी., गुणपत्रक, जात प्रमाणपत्र, आदी मूळ कागदपत्रे दोन झेरॉक्स प्रतीसह जोडावेत.
१८) ऑनलाईन प्रवेश फॉर्म व फीस भरून कार्यालयात दाखल करून पावती घ्यावी.

## क्रीडा विभाग

शारीरिक शिक्षण मुलांच्या वैयक्तिक व सामाजिक गरजांची निकड पाहून त्यांचा सर्वांगीण विकास, शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकास करण्यास मदत करते. तसेच शारीरिक शिक्षण हे लोकशाही नागरिकत्वाचे शिक्षण देण्यासाठीही महत्वाचे आहे.

म्हणून आमच्या महाविद्यालयात स्वदेशी व विदेशी तसेच इन डोअर व आऊट डोअर खेळाची सोय विद्यार्थ्यांसाठी करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी अद्यावत जीमची सोय मबीफ विंगच्या अंडरग्रांऊडमध्ये केली आहे.

## * महत्वाच्या सूचना *

१) महाविद्यालयात भरलेली फीस कोणत्याही कारणास्तव परत दिली जाणार नाही.
२) डुप्लीकेट टी.सी.च्या आधारावर प्रवेश दिला जाणार नाही.
३) कार्यालयात दिलेली कागदपत्रे अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत परत दिली जात नाहीत. कागदपत्रांच्या जादा सत्यप्रती विद्यार्थ्यांनी स्वत: जवळ ठेवाव्यात.
४) टी.सी.वर खाडाखोड करणे दखलपात्र गुन्हा असून, त्याबद्दल प्रवेश रद्द केला जातो.
५) मूळ कागदपत्रे कार्यालयात सादर केल्यावर पावती घ्यावी.
६) ११ वी व १२ वी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना गणित ऐवजी समाजशास्त्र / पशुविज्ञान हा विषय घेता येतो.
७) एकदा विषय निश्चित केल्यास ते अंतिम समजावेत.

*KSP Mandal's*

# Shivaji Mahavidyalaya, Udgir.

## *Statement of Fees Structure (Junior College) for the Year 2023 -24*

| Sr. No. | Class / Particulars | 11th Arts | 11th Com. | 11th Sci. | 11th Voc. | 12th Arts | 12th Com. | 12th Sci. | 12th Voc. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Tuition Fees | 192 | 192 | 192 | 240 | 216 | 216 | 216 | 300 |
| 2. | Adm. Feed | 16 | 16 | 16 | 20 | 18 | 18 | 18 | 20 |
| 3. | Term Fees | 32 | 32 | 32 | 40 | 36 | 36 | 36 | 50 |
| 4. | SAF Fees | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 | 80 |
| 5. | I-Card Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 6. | Home Fees | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 | 250 |
| 7. | Lab Fees | – | – | 70 | 80 | – | – | 70 | 100 |
| 8. | SMS Charges | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| | Total | 720 | 720 | 790 | 860 | 750 | 750 | 800 | 950 |

**Eligibility Fee for : out of Board / State - 400 + 100 = 500**

## FEES FOR THOSE OFFERING NON GRANT SUBJECTS

| Sr. | Particulars | 11th | 12th | Total |
|---|---|---|---|---|
| 1. | Jr. (Electronics) Lab Fee | 5000 | 5000 | 10,000 |
| 2. | Jr. (Dairy Science) Lab Fee | 5000 | 5000 | 10,000 |
| 3. | Jr. (Computer Science) Lab Fee | 5000 | 5000 | 10,000 |

**नोट : प्रवेश घेतेवेळेस पूर्ण शुल्क भरणे बंधनकारक आहे.**

किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर द्वारा संचलित

# विद्यालये, महाविद्यालये व वसतिगृहे

१. शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय, उदगीर
२. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, उदगीर
३. जिजामाता मुलींचे वसतिगृह, उदगीर
४. महात्मा फुले वरिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर
५. महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय, अहमदपूर
६. महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, अहमदपूर
७. महात्मा फुले प्राथमिक विद्यालय, अहमदपूर
८. सावित्रीबाई फुले मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, अहमदपूर
९. विद्यावर्धिनी माध्यमिक विद्यालय, उदगीर
१०. विद्यावर्धिनी प्राथमिक विद्यालय, उदगीर
११. विद्यावर्धिनी इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळा, उदगीर
१२. विद्यावर्धिनी इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा, उदगीर
१३. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर
१४. शिवाजी विद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर
१५. शिवाजी प्राथमिक विद्यालय, हंडरगुळी ता.उदगीर
१६. किसान मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, हंडरगुळी ता.उदगीर
१७. निर्मलपुरी कनिष्ठ महाविद्यालय, हेर, ता.उदगीर
१८. निर्मलपुरी विद्यालय, हेर, ता.उदगीर
१९. जिजामाता विद्यालय, तोंडचिर, ता.उदगीर
२०. नागाबुवा विद्यालय, हेळंब, ता.देवणी
२१. नागाबुवा मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह, हेळंब, ता.देवणी
२२. शाहू विद्यालय, शेळगाव, ता.चाकूर




अत्याधुनिक सोयीनी युक्त कार्यालय



सुसज्ज ग्रंथालय



वातानुकूलित सभागृह




जिजामाता मुलींचे वसतिगृह

Rs. 50/-